Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय -** **पूर्ण वेळ कार्यालयात उपस्थित राहणेबाबत**

**संदर्भ -** विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /१४६७ दि.२२ संप्टेबंर, २०२०.

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, दि.२२ संप्टेबंर, २०२०.रोजीच्या परित्रकानुसार विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत सविस्तर कळविण्यात आलेले आहे. परंतु कार्यालयाच्या असे निदर्शनास येते की, काही कर्मचारी कार्यालयीन वेळेनुसार पूर्ण वेळ कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, त्यामूळे कार्यालयीन कामकाजास बाधा येत आहे. त्याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार कळविल्याप्रमाणे **सर्व कर्मचारी यांनी कार्यालयाच्या वेळेनुसार पूर्ण वेळ कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.** याबाबत संबधित विभागप्रमुख यांनी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव
15/10

**जा.क्र. आस्थापना/** 1578
**दि.** 15 OCT 2020
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## प रि प त्र क

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ -** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१२३६ / दि.३१ जूलै, २०२० व त्यामधील संदर्भ क्र. १ ते ११ पत्र व परिपत्रक
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.
३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू आरआर /७५५/२०२० दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.
४. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. १८ सप्टेंबर, २०२०
५. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१३९८ / दि. १८ सप्टेंबर, २०२०
६. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. २१ सप्टेंबर, २०२०

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानूसार उपरोक्त संदर्भीय क्र. ५ परिपत्रकाअन्वये विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १००% उपस्थिती राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु उपरोक्त संदर्भीय क्र.६ शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची **उपस्थिती आवश्यक** असणार आहे. सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.
२. विद्यापीठातील सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील कर्मचारी नियमितपणे प्रत्यक्ष कार्यालयात **(१००%)** उपस्थित राहतील.
३. सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील व परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित कर्मचारी वगळता उर्वरित सेवकांची **५०%** याप्रमाणे सेवकांना आळीपाळीने (Rotation) प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहतील. तसेच विभाग प्रमुख यांना उर्वरित सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. याचे नियोजन संबधित विभाग प्रमुख यांनी करावे. ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळालेली आहे त्यांनी घरी राहून (Work from Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. उपरोक्त नूसार संबधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक अधिकारी / सेवक कार्यालयात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.
४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग, व अभियांत्रिकी विभागअतंर्गत असलेली अत्यावश्यक सेवा) आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.
५. उपरोक्त प्रमाणे व आवश्यकतेनूसार विभागप्रमुख यांच्या आदेशानुसार सदर कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.
६. उपस्थित सर्व कर्मचारी यांनी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
७. सदर आदेश पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत लागू राहतील.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 1467
दि. 22 SEP 2020
**प्रति,**

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पढील योग्य त्या कार्यवाहीसाठी